# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. तेजस्विनी भागवत

---

शब्दबंध सुंदरसे बांधून
निर्मीतो अर्थपूर्ण काव्य एक कवी,
जाणुनी कल्पनेपलीकडले
जे देखे कवी, ते न देखे रवी...

अभिजात संगीताची निर्मिती
होई सुंदरशा काव्यामधूनी,
मग होई पूर्तता त्याची
गायन, वादन अन् नर्तनामधूनी...

संगीत गुणगुणते
दोन जीवांचे मिलन,
अन् तेच दाखवी त्यांचे
विरहातील दुःखी मन...

संगीत वर्णीते
साज सहा ऋतूंचे
शब्दातूनी रंगे
रुपडे निसर्गाचे...

संगितातूनी कळतो
चंद्र कोजागिरीचा,
त्यातूनच कळतो
काळोख अवसेचा...

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

संगीत गुंफिते
नात्यांचे रेशीमबंध,
अन् द्विगुणित होतो
जगण्याचा आनंद...

संगीत करते ताजेतवाने
कोमेजलेल्या ह्या मना,
शब्दात ह्या येती नकळत
अंतर्मनातील भावना...

संगीत कुणाचा ध्यास
तर असे कुणाचा श्वास,
कानसेनांच्या मैफिलीत ह्या
बरसते संगीत खास...

संगीत असे माध्यम
व्यक्त करते भावना,
संगीत असे जादुई दुवा
जोडणारा मना - मना...

Anahat Music Therapy